**प्रेस नोट** दि.२९/०३/२०२३

नवघर पोलीस स्टेशन येथील लोकसेवक अमितकुमार एकनाथ पाटील, पोलीस हवालदार/०५०३४ यांना खाजगी इसम नामे अमित राकेश मिश्रा यांचेमार्फतीने लाच स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :– | नवघर पोलीस स्टेशन, मिरा–भाईंदर पोलीस आयुक्तालय<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र. २३/१५.५७ वा. दि.२९.०३.२०२३ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | १) लोकसेवक अमितकुमार एकनाथ पाटील वय:– ३८ वर्षे, पद:– पोलीस हवालदार/५०३४ नेमणुक:– नवघर पोलीस स्टेशन, मिरा–भाईंदर पोलीस आयुक्तालय (वर्ग– ३) |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | १००००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | १००००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | तक्रारदार यांचे भाडयाचे जनरल स्टोअर्सचे दुकान असून, सदर दुकानात ते तंबाखु व गुटखा विकण्याचे काम करीत होते. मध्या त्यांचा गुटखा विक्रीचा धंदा बंद आहे. तरीदेखील लोकसेवक अमितकुमार एकनाथ पाटील, पोलीस हवालदार/०५०३४, वय:–३८ वर्षे, नेमणुक मिरा–भाईदर पोलीस आयुक्तालय यांनी तक्रारदार यांचेकडे गुटखा व तंबाखु विक्री करणेकरीता चालू महिन्याचे आठ हजार व मागील महिन्याचे आठ हजार असे एकूण सोळा हजार रुपयाची लाचेची मागणी केली होती. परंतु तक्ररदार यांना लोकसेवक अमितकुमार एकनाथ पाटील यांना लाच दयावयाची नसल्याने त्यांनी दिनांक २७/०३/२०२३ रोजी लोकसेवक अमित कुमार पाटील हे १६०००/–रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>. त्याप्रमाणे दिनांक २७/०३/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक अमितकुमार एकनाथ पाटील यांचे समक्ष खाजगी इसम मध्यस्थी श्री.संजय यादव यांनी तक्ररदार यांचेकडे लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवक अमितकुमार पाटील यांनी दुसरे खाजगी इसम मध्यस्थी अमित मिश्रा यांचेकडे पुढील बोलणी करण्याचे तक्ररदारास सांगितले.<br>त्यानंतर दि.२८/०३/२३ रोजी खाजगी इसम संजय यादव व खाजगी इसम अमित मिश्रा यांनी रुपये दहा हजार इतकी लाचेची रक्कम फिक्स करुन, सदर दहा हजार लाचेची रक्कम आज दिनांक २९/०३/२०२३ रोजी मध्यस्थी श्री.अमित राकेश मिश्रा यांनी ते काम करीत असलेल्या नवघर येथील गौरवधर्म काटा या ऑफीसमध्ये स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. तसेच लोकसेवक श्री. अमितकुमार पाटील यांनाही ताब्यात घेण्यात आले असून, त्याबाबत नवघर पोलीस स्टेशन येथे स्टेशन डायरी नोंद क्र.—२३ वेळ १५.५७ वा. दि.२९.०३.२०२३ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे. सदर बाबत पुढील कारवाई सुरू आहे |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.सुनिल लोखंडे, सो.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.अनिल घेरडीकर सो.अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अँप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(स्वप्निल जुईकर)
पोलीस निरीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, ठाणे.